RNI No. MAHBIL 2012/47976
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग एक–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १४, अंक - ०७ ] सोमवार, डिसेंबर ८, २०२५ / अग्रहायण १७, शके १९४७ [ पृष्ठे १०

## असाधारण क्रमांक ०७

## प्राधिकृत प्रकाशन

**आयुक्त तथा प्रशासक यांजकडून**

**इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी**

*इचलकरंजी शहराच्या प्रारूप विकास योजनेमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८ (४) अन्वये केलेल्या बदलाचे व नकाशाचे प्रसिद्धीकरण*

**जाहीर सूचना**

क्रमांक प्रा.वि.यो.इचलकरंजी/कलम २८*(४)*/न.र.वि.१०८१/२०२५.—ज्याअर्थी, इचलकरंजी महानगरपालिकेने, नियोजन प्राधिकरण म्हणून, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६, चे कलम २६ *(१)* नुसार महानगरपालिकेच्या संपूर्ण क्षेत्राची प्रारूप विकास योजना तयार करून ठराव क्रमांक ७०, दिनांक १२ फेब्रुवारी २०२४ नुसार नागरिकांच्या सूचना / हरकती मागविण्यासाठी प्रसिद्ध केली आहे. सदरची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-पुणे विभागीय पुरवणी, फेब्रुवारी १५-२१, २०२४ रोजी प्रसिद्ध झाली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रारूप विकास योजनेवर विहित मुदतीत प्राप्त सूचना व हरकतींचा विचार करून उक्त अधिनियमाच्या कलम २८ *(२)* नुसार स्थापन झालेल्या नियोजन समितीने तिचा अहवाल उक्त नियोजन प्राधिकरणाकडे दिनांक २० सप्टेंबर २०२४ रोजी सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, नियोजन समितीने सादर केलेल्या अहवालावर विचारांती उक्त नियोजन प्राधिकरणाने उक्त प्रारूप विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८ *(४)* अंतर्गत फेरबदल / बदल करण्यासाठी व ती उक्त अधिनियमाच्या कलम ३० अन्वये शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यासाठी प्रशासकीय ठराव क्रमांक १०२/२०२५, दिनांक ४ डिसेंबर २०२५ पारित केलेला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २८ *(४)* खालील तरतुदीनुसार उक्त प्रारूप विकास योजनेच्या मसुद्यात / प्रारूप नकाशात केलेले फेरबदल / बदल नागरिकांच्या अवलोकनार्थ प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम २८ *(४)* नुसार केलेले फेरबदलांची सूची प्रारूप विकास योजनेच्या नकाशावर दर्शवून सदर नकाशा नागरिकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर फेरबदल / बदल निळ्या रंगाने उक्त प्रारूप विकास योजनेत दर्शविण्यात आले असून सदर नकाशा आयुक्त, इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी यांचे कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आला आहे.

**विकास योजना इचलकरंजी**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८ *(४)* खालील**

**फेरबदल दर्शविणारी सूची**

**सेक्टर १**

एम १/१ आ. क्र. १/११, ट्रक टर्मिनस खालील अटीवर वगळण्यात येत असून त्या खालील जागा निवासी विभागात समाविष्ट करण्यात येत आहे.

**अटी -** आरक्षणाखालील एकूण जागेच्या १० टक्के जागा नकाशात दर्शविल्याप्रमाणे महापालिका उद्देशासाठी प्रस्तावित केले आहे. सदर जागा विनामूल्य मोफत (कोणत्याही भरपाईशिवाय) महानगरपालिकेला देण्यात यावी.

एम १/२ मा. उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक ९६४२/२०१० मध्ये दिलेल्या निर्णयानुसार, मंजूर विकास मधील आ. क्र. ५/१६ (प्राथमिक शाळा आणि क्रीडांगण) हे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२७ च्या तरतुदीनुसार रद्द करण्यात आले आहे. सदर बाब विचारात घेता प्रारूप विकास योजनेतील त्याच जागेवर असलेले आ. क्र. १/२० (प्राथमिक शाळा आणि क्रीडांगण) वगळण्यात येत आहे आणि त्या खालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे.

एम १/३ आरक्षण क्र. १/३४, बगीचा मंजूर अभिन्यासावर प्रस्तावित आहे. मंजूर अभिन्यासवरील आरक्षणाचे क्षेत्र अंशत: वगळण्यात आले असून त्या जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे. उर्वरित क्षेत्रावर नकाशात दर्शविल्याप्रमाणे बगीचा आरक्षण कायम ठेवण्यात आले आहे.

एम १/४ प्रस्तावित आरक्षण क्र. १/४८, पार्कमध्ये खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित करण्यात आले आहे.

अ) प्रस्तावित आरक्षणामध्ये असलेले बांधकाम व्याप्त क्षेत्र आणि गट क्र. ४५४ चा भाग आरक्षणातून नकाशात दर्शविलेप्रमाणे वगळण्यात येत असून त्या जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे.

ब) आ.क्र. १/५३ (दवाखाना) वगळण्यात येऊन त्या खालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे. सदर आरक्षण उक्त आरक्षण क्र. १/४८, पार्कमध्ये खदानच्या दक्षिणेस दोन रस्त्यांचे जोडावर स्थलांतरित करून प्रस्तावित करण्यात आले आहे.

वरील बदलाव्यतिरिक्त उर्वरित क्षेत्र आरक्षण क्र. १/४८, पार्कमध्ये कायम ठेवण्यात आले आहे.

एम १/५ इचलकरंजी औद्योगिक सहकारी इस्टेट लिमिटेड यांचे मौजे शहापूर गट क्र. ४७०/अ, ७५१, ७५३ ते ७७३, ७८१ ते ७८५, ७८९ ते ८०४ यावरील औद्योगिक वापराकरिता मंजूर असलेल्या लेआउटमधील औद्योगिक भूखडक, अंतर्गत रस्ते, खुली जागा, सुविधा क्षेत्र इत्यादी (संपूर्ण लेआउट मधील भू-वापर) हा प्रारूप विकास योजनेवरील निर्देशनापेक्षा वरचढ राहील. पर्यायाने लेआऊटमधील औद्योगिक भूखडक वर प्रस्तावित असलेले १/५४ (बगीचा) रद्द करून त्याखालील जागा औद्योगिक विभागात सामाविष्ट केली आहे. उर्वरित जागेवरील आरक्षण कायम ठेवण्यात आले आहे.

एम १/६ प्रस्तावित आरक्षण क्र. १/६७, बगीचा खालील क्षेत्रामध्ये विद्यमान बांधकामे असल्याने सदर आरक्षण वगळून त्या खालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे.

एम १/७ प्रस्तावित आरक्षण क्र. १/७०, बगीचा वगळून त्या खालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे.

एम १/८ प्रस्तावित आरक्षण क्र. १/७१, बेघरांसाठी घरे खालील क्षेत्रामध्ये विद्यमान बांधकामे असल्याने सदर आरक्षण वगळून त्या खालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे.

एम १/९ गट क्र. ८४३, शहापूर यावर दर्शविलेला विद्यमान बगीचा वापर रद्द करून औद्योगिक वापर विभाग दर्शविण्यात आला आहे.

एम १/१० गट क्र. २३९-सी, शहापूर यावर दर्शविलेला विद्यमान सार्वजनिक / निम-सार्वजनिक वापर रद्द करून रहिवास वापर विभाग दर्शविण्यात आला आहे.

एम १/११ गट क्र. १७७, १७८, १७३, १७२, १७०, १६९, शहापूर यावर दर्शविलेला विद्यमान औद्योगिक वापर रद्द करून रहिवास वापर विभाग दर्शविण्यात आला आहे.

एम १/१२ गट क्र. २४५, २४६, शहापूर यावर दर्शविलेला विद्यमान सार्वजनिक / निम-सार्वजनिक वापर रद्द करून रहिवास वापर विभाग दर्शविण्यात आला आहे.

एम १/१३ प्रस्तावित आरक्षण क्र. १/६८ (TCFC) वगळून खालील अटीवर वगळण्यात येत असून त्या खालील जागा निवासी विभागात समाविष्ट करण्यात येत आहे.

**अटी -** आरक्षणाखालील एकूण जागेपैकी ४००० चौ.मी. जागा नकाशात दर्शविल्याप्रमाणे महापालिका उद्देशासाठी प्रस्तावित आहे. सदर जागा विनामूल्य मोफत (कोणत्याही भरपाईशिवाय) मनपास देण्यात यावी.

एम १/१४ प्रस्तावित आरक्षण क्र. १/४२, मनपा उपयोगाकरिता असलेले आरक्षण वगळून त्या खालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे.

एम १/१५ प्रस्तावित आरक्षण क्र. १/४९, फायर ब्रिगेडकरिता असलेले आरक्षण पैकी गट क्र. ४६६, शहापूरचे क्षेत्र वगळून त्या खालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे. उर्वरित क्षेत्रावरील आरक्षण कायम ठेवण्यात आले आहे.

एम १/१६ प्रस्तावित आरक्षण क्र. १/१८, म्हाडाकरिता असलेले आरक्षण वगळून त्या खालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे.

एम १/१७ प्रस्तावित आरक्षण क्र. १/१२, रिक्रीएशनल ग्राऊंडकरिता असलेले आरक्षण पैकी गट क्र. ३८ शहापूरचे क्षेत्र वगळून त्या खालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे. उर्वरित क्षेत्रावरील आरक्षण कायम ठेवण्यात आले आहे.

एम १/१८ प्रस्तावित आरक्षण क्र. १/५ प्राथमिक शाळा आणि क्रीडांगणकरिता असलेले आरक्षण वगळून त्या खालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे.

एम १/१९ प्रस्तावित आरक्षण क्र. १/२, क्रीडांगणकरिता असलेले आरक्षण वगळून त्या खालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे.

एम १/२० प्रस्तावित आरक्षण क्र. १/५९, मनपा उपयोग यांनी आ. क्र. १/६०, दवाखाना ही दोन्ही आरक्षणे आ. क्र. १/५८, क्रीडांगणच्या पूर्वेस रस्त्यालगत नकाशात दर्शविल्याप्रमाणे स्थलांतरित करून प्रस्तावित करण्यात आले आहे. मूळ आ. क्र. १/५९, मनपा उपयोग आणि आ. क्र. १/६०, दवाखाना खालील जागा निवासी विभागात समाविष्ट करण्यात आली आहे.

एम १/२१ प्रस्तावित आरक्षण क्र. १/३३, क्रीडांगणकरिता असलेले आरक्षणाचा उद्देश प्राथमिक शाळा आणि क्रीडांगण उपयोग असा करण्यात आलेला असून सदर आरक्षणाचे समुचित प्राधिकरण श्री सद्‌गुरू पंत महाराज शिक्षण प्रसारक मंडल, इचलकरंजी असे करण्यात आले आहे.

एम १/२२ प्रस्तावित आरक्षण क्र. १/२९, बगीचाकरिता असलेले आरक्षण पश्चिमेकडून भागश: वगळून त्या खालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे. उर्वरित क्षेत्रावरील आरक्षण कायम ठेवण्यात आले आहे.

एम १/२३ आ. क्र. १/९, पोलिस स्टेशन पश्चिम हद्दी लगतचा १२ मीटर रुंद रस्ता रद्द करून त्याखालील जागा आ. क्र. १/९, पोलिस स्टेशनमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.

### सेक्टर २

एम २/१ प्रस्तावित आरक्षण क्र. २/५, ग्रीन बेल्ट खालील क्षेत्रामध्ये विद्यमान बांधकामे असल्याने सदर आरक्षण वगळून त्या खालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे. सदर ग्रीन बेल्ट आ. क्र. २/८ मध्ये दक्षिण हद्दीपासून आतमध्ये प्रस्तावित करण्यात आला आहे.

एम २/२ प्रस्तावित आरक्षण क्र. २/१०, क्रीडांगणकरिता असलेले आरक्षण पैकी CEPT संस्थेने संपादित केलेले क्षेत्र विचारात घेता दक्षिणेकडील वि.यो. १५ मीटर रस्त्याची आखणी मंजूर वि.यो. प्रमाणे ठेवून या सुधारित आखणीचे दक्षिणेकडील रस्त्यासहित क्षेत्र भागश: निवासी विभागात तर भागश: आ. क्र. २/११ (पार्क) मध्ये समाविष्ट करण्यात येत आहे. उर्वरित क्षेत्रावरील आरक्षण कायम ठेवण्यात आले आहे.

एम २/३ प्रस्तावित आरक्षण क्र. २/१८, कत्तलखानाकरिता असलेले आरक्षणाचा उद्देश मनपा उपयोग असा करण्यात आलेला आहे.

एम २/४ प्रस्तावित आरक्षण क्र. २/७, बगीचाकरिता असलेले आरक्षण वगळून त्या खालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे, तसेच त्यालागतचा २४ मीटर रस्त्याची आखणी मंजूर वि.यो.प्रमाणे ठेवण्यात आली आहे. सदर बदलामुळे मुक्त झालेले क्षेत्र निवासी क्षेत्रामध्ये करण्यात आले आहे.

एम २/५ आ. क्र. २/२५, (बगीचा) मधील विद्यमान बांधकाम असलेला भाग वगळून त्याखालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे, तसेच आरक्षणाच्या पश्चिम हद्दी लगत (आरक्षणाच्या आत) १५ मीटर उत्तर-दक्षिण रस्ता प्रस्तावित करण्यात येत आहे. उर्वरित क्षेत्र आ.क्र. २/२५ (बगीचा) साठी कायम करण्यात येत आहे.

एम २/६ आक्र. २/२४, क्रीडांगणमधील पूर्वेकडील ५० टक्के क्षेत्र रद्द करून त्याखालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे. उर्वरित क्षेत्र आ.क्र. २/२४, क्रीडांगणासाठी कायम करण्यात येत आहे.

एम २/७ प्रस्तावित आरक्षण क्र. २/४ (टेलिफोन एक्सचेंग) करिता असलेले आरक्षण वगळून त्या खालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे.

एम २/८ आ.क्र. २/३९ (क्रीडांगण) मधील उत्तर-पश्चिम कोपऱ्यामधील वगळून त्याखालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे. उर्वरित जागेपैकी सिटीस ९७१८ मध्ये दुकान केंद्र आणि सिटीस ९७१० सह रि.स.क्र. ६९० मध्ये क्रीडांगण प्रस्तावित करण्यात आले आहे.

एम २/९ प्रस्तावित आरक्षण क्र. २/४१, क्रीडांगणाकरिता असलेले आरक्षण वगळून त्या खालील जागेचा समावेश विद्यमान क्रीडांगण म्हणून करण्यात येत आहे.

एम २/१० मंजूर विकास योजना इचलकरंजी मधील स. क्र. ६६० (इचलकरंजी) यावरील प्रस्तावित आरक्षण क्रमांक २/४३ (बगीचा) आणि आरक्षण क्रमांक २/४४ (दवाखाना, वाचनालय, भाजीमंडई) हे अधिनियमाचे कलम १२७ च्या खरेदी सूचनेच्या अनुषंगाने व्यपगत होत असल्याने प्रारूप विकास योजनेतील त्याच जागेवरील प्रस्तावित आ.क्र. २/४३ (बगीचा) पूर्णपणे आणि आ.क्र. २/४४ (भाजीमंडई व दुकान केंद्र) भागश: वगळून त्याखालील जमीन रहिवास विभागात समाविष्ट करणेत येत आहे. उर्वरित आ.क्र. २/४४ (भाजीमंडई व दुकान केंद्र) क्षेत्रावरील आरक्षण भाजीमंडई व दुकान केंद्रासाठी कायम ठेवण्यात आले आहे.

एम २/११ प्रस्तावित आरक्षण क्र. २/४६, क्रीडांगणापैकी उत्तरेकडून ५० टक्के क्षेत्र आरक्षणातून वगळून त्या खालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे. आरक्षणातील उर्वरित क्षेत्र आणि त्यालगतचे आ. क्र. २/४७ (माध्यमिक शाळा आणि क्रीडांगण) एकत्रित करून (माध्यमिक शाळा आणि क्रीडांगणाकरिता) आरक्षण कायम ठेवण्यात आले आहे.

एम २/१२ प्रस्तावित आरक्षण क्र. २/४८, माध्यमिक शाळाकरिता असलेले आरक्षण वगळून त्या खालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे.

एम २/१३ मंजूर विकास योजना इचलकरंजीमधील प्रस्तावित आरक्षण क्रमांक ३६ (प्राथमिक शाळा आणि क्रीडांगण) हे अधिनियमाचे कलम १२७ च्या खरेदी सूचनेच्या अनुषंगाने व्यपगत होत असल्याने प्रारूप विकास योजनेतील त्याच जागेवरील प्रस्तावित आ.क्र. २/५४ (प्राथमिक शाळा आणि क्रीडांगण) हे आरक्षण वगळून त्याखालील जमीन रहिवास विभागात समाविष्ट करणेत येत आहे.

एम २/१४ प्रस्तावित आरक्षण क्र. २/३८ (दुकान केंद्र) याचा उद्देश बगीचा असे करून आरक्षण कायम ठेवण्यात आले आहे.

## सेक्टर ३

एम ३/१ मंजूर विकास योजना इचलकरंजी मधील प्रस्तावित आ.क्र. २८ (दुकान केंद्र) हे अधिनियमाचे कलम १२७ च्या खरेदी सूचनेच्या अनुषंगाने व्यपगत होत असल्याने प्रारूप विकास योजनेतील त्याच जागेवरील प्रस्तावित आ.क्र. ३/१८ (दवाखाना) हे आरक्षण वगळून त्याखालील जमीन रहिवास विभागात समाविष्ट करणेत येत आहे.

एम ३/२ मंजूर विकास योजना इचलकरंजीमधील प्रस्तावित आरक्षण क्रमांक २५ (क्रीडांगण) मधील पूर्वेकडील भागश: क्षेत्र अधिनियमाचे कलम १२७ च्या खरेदी सूचनेच्या अनुषंगाने व्यपगत होत असल्याने प्रारूप विकास योजनेतील त्याच जागेवरील प्रस्तावित आ.क्र. ३/१९ (बगीचा) हे आरक्षण भागश: वगळून त्याखालील जमीन रहिवास विभागात समाविष्ट करणेत येत आहे. उर्वरित क्षेत्रावरील आरक्षण बगीचा साठी कायम ठेवण्यात आले आहे.

एम ३/३ आरक्षण क्र. ३/३१, भाजी मंडई, सर्व्हे नंबर ५१२/३ वरील अंतिम मंजूर अभिन्यासावर प्रस्तावित आहे. मंजूर अभिन्यासवरील आरक्षणाचे संपूर्ण क्षेत्र वगळण्यात आले असून त्या जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे.

एम ३/४ मंजूर विकास योजना, इचलकरंजीमधील प्रस्तावित आ.क्र. २१ (क्रीडांगण) हे अधिनियमाचे कलम १२७ च्या खरेदी सूचनेच्या अनुषंगाने व्यपगत होत असल्याने प्रारूप विकास योजनेतील त्याच जागेवरील प्रस्तावित आ.क्र. ३/२४ (भाजी मंडई) हे आरक्षण वगळून त्याखालील जमीन रहिवास विभागात समाविष्ट करणेत येत आहे.

एम ३/५ प्रस्तावित आरक्षण क्र. ३/२२ (क्रीडांगण) आणि आ.क्र. ३/२३ (दवाखाना आणि वाचनालय) करिता असलेले आरक्षण वगळून त्या खालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे.

## सेक्टर ४

एम ४/१ आरक्षण क्र. ४/१, क्रीडांगणामधील गट नंबर २५-बी वरील मंजूर अभिन्यासवरील आरक्षणाचे क्षेत्र वगळून त्या खालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे. उर्वरित क्षेत्रावर बगीचा आरक्षण कायम ठेवण्यात आले आहे, तसेच या आरक्षणास पश्चिम हद्दी लगत उत्तर-दक्षिण ९ मीटर रस्ता प्रस्तावित करण्यात आला आहे.

एम ४/२ प्रस्तावित आरक्षण क्र. ४/६, दवाखानाकरिता असलेले आरक्षण वगळून त्या खालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे आणि आ.क्र. ४/४, बगीचा या आरक्षणाचे नामाभिमान दवाखाना असे करण्यात येत आहे.

एम ४/३ प्रस्तावित आरक्षण क्र. ४/१२, क्रीडांगण खालील क्षेत्रामध्ये विद्यमान बांधकामे असल्याने सदर आरक्षण वगळून त्या खालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे.

एम ४/४ आरक्षण क्र. ४/१८, बगीचामधील गट नंबर ११५, ११६ वरील मंजूर अभिन्यासवरील बगीचा आरक्षणाचे संपूर्ण क्षेत्र वगळून त्या खालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे.

एम ४/५ प्रस्तावित आ. क्र. ४/२४ (दवाखाना) हे आरक्षण वगळून त्याखालील जमीन रहिवास विभागात समाविष्ट करणेत येत आहे.

एम ४/६ मंजूर विकास योजना, इचलकरंजीमधील प्रस्तावित आ.क्र. ३/३२ (बगीचा) अधिनियमाचे कलम ३७ *(२)* फेरबदल मंजुरीचे अधिसूचनेनुसार वगळण्यात आल्याने प्रारूप विकास योजनेतील त्याच जागेवरील प्रस्तावित आ.क्र. ४/३३ (बगीचा) हे आरक्षण वगळून त्याखालील जमीन रहिवास विभागात समाविष्ट करणेत येत आहे.

एम ४/७ आरक्षण क्र. ४/१४, क्रीडांगणमधील जागेमध्ये गुंठेवारी मंजूर असल्याने त्यावरील प्रस्तावित संपूर्ण आरक्षणाचे क्षेत्र वगळून त्या खालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे.

एम ४/८ आरक्षण क्र. ४/२०, लहान मुलांचे क्रीडांगणमधील जागेमध्ये मंजूर अभिन्यास असल्याने त्यावरील संपूर्ण आरक्षणाचे क्षेत्र वगळून त्या खालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे.

एम ४/९ प्रस्तावित आरक्षण क्र. ४/२९, मनपा उपयोगकरिता असलेले आरक्षण वगळून त्या खालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे.

एम ४/१० गट क्र. ५२८, ५२९, ५३० मधून पूर्व-पश्चिम १२ मीटर रस्त्यामध्ये गुंठेवारी मंजूर असल्याने नकाशात दर्शविल्याप्रमाणे आखणी सुधारित केली आहे. सुधारित आखणीमुळे मुक्त झालेले उत्तरेकडील आणि दक्षिणेकडील क्षेत्र त्यालगतच्या जमीन वापर विभागामध्ये समाविष्ट केले आहे. या बदलामुळे आ.क्र. २/३३ (क्रीडांगण) च्या हद्दीमध्ये सुधारणा केली आहे.

एम ४/११ प्रस्तावित आरक्षण क्र. ४/३४, फायर ब्रिगेड आणि आ.क्र. ४/२५, वाहनतळ वगळून त्या खालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे

**सेक्टर ५**

एम ५/१ आरक्षण क्र. ५/१२, ५/१३, ५/१४, ५/१५, ५/१६, ५/१७ या आरक्षणामध्ये विद्यमान बांधकामे असल्याने उपरोक्त आरक्षणाचे संपूर्ण क्षेत्र वगळून त्या खालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे.

एम ५/२ आ. क्र. ५/२८ (बगीचा आणि वाहनतळ) याचा उद्देश मंजूर नगर रचना योजनेप्रमाणे फक्त बगीचा असा करण्यात आला आहे.

एम ५/३ प्रस्तावित आरक्षण क्र. ५/३०, मनपा उपयोग आणि वाहनतळकरिता असलेले आरक्षण न्यायालयाचे निर्णयाचे अनुषंगाने वगळून त्या खालील जागेचा समावेश निवासी क्षेत्रामध्ये करण्यात येत आहे.

एम ५/४ नगर रचना यो. क्र. २ मधील अंतिम भू. क्र. १७ वर दर्शविलेले विद्यमान क्रीडांगण अस्तित्वात नसल्याने नगर रचना यो.प्रमाणे रहिवास विभागात दर्शविण्यात आले आहे.

**जमीन वापर बदल**

एम झेड १ मौजे इचलकरंजी, गट नंबर ६५, ६६, ६७ या जागेचा वापर शेती विभागामधून निवासी विभागात समाविष्ट करण्यात आला आहे.

एम झेड २ मौजे शहापूर, गट नंबर ३९९, ४००, ४०१, ४०२, ४२१, ४२२ मधील जमीन विद्यमान तळे म्हणून दर्शविली आहे. जागेवर बंद खदान असल्याने विद्यमान तळे ऐवजी बंद खदान असे निर्देशन करण्यात आले आहे.

**पल्लवी पाटील,**

आयुक्त तथा प्रशासक,

इचलकरंजी, ५ डिसेंबर २०२५.

इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी.

**BY COMMISSIONER AND ADMINISTRATAOR**

**ICHALKARANJI MUNICIPAL CORPORATION, ICHALKARANJI**

*Publication of Draft Modifications / Changes in Draft Development Plan of Ichalkaranji Municipal Corporation Under Section 28 (4) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966*

**NOTICE**

क्रमांक प्रा.वि.यो.इचलकरंजी/कलम २८*(४)*/न.र.वि.१०८१/२०२५.—Whereas, Ichalkaranji Municipal Corporation, being Planning Authority, has published the Draft Development Plan of Ichalkaranji Municipal Corporation under Section 26 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, *vide* Resolution No. 70, dated 12th February 2024 for inviting suggestions / objections from public. The said Notice is published in Maharashtra Government Gazette of Part One-Pune Divisional Supplement, February 15-21, 2024 ;

and whereas, after considering the suggestions / objections to the said Plan received within stipulated period, the Planning Committee constituted under Section 28 *(2)* of the said Act, has submitted its report to the said Planning Authority on dated 20th September 2024 ;

and whereas, the said Planning Authority after considering the report submitted by Planning Committee, passed Administrative Resolution No. 102/2025, dated 4th December 2025 to make modifications / changes in the said Draft Published Plan as mention under Section 28 *(4)* of the said Act and to submit the said Plan along with the said Modification for sanction to the Government under Section 30 of the said Act ;

and whereas, it is necessary to publish the said Modifications / Changes made in the said Draft Published Plan for inspection of the public as per Section 28 *(4)* of the said Act.

Now, therefore, the said Draft Development Plan showing the said Modifications in blue colour along with the list of modifications made under Section 28 *(4)* of the Act, by the said Planning Authority is hereby published as shown on the Draft Plan for information of the public. Also these plans are kept open for the inspection of the public in the office of Commissioner, Ichalkaranji Municipal Corporation, Ichalkaranji on working days, during office hours.

**SCHEDULE**

**DRAFT DEVELOPMENT PLAN, ICHALKARANJI**

**MODIFICATION PROPOSED BY PLANNING AUTHORITY UNDER SECTION 28 *(4)* OF MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966**

| Modification Nos. | Modification Proposed by Planning Authority under Section 28 *(4)* of MR and TP Act, 1966 |
|---|---|
| 1 | 2 |
| | **SECTOR I** |
| M I/1 | Site No. I/11, Truck Terminus is deleted and land thereunder included in Residential Zone subject to 10 per cent land is proposed for Amenity Space / Municipal Purpose as shown on plan and handover the same free of cost (without any compensation in any form) to Municipal Corporation. |
| M I /2 | Site No. V/16 (PS and PG) from sanctioned Development Plan is lapsed under the provision of Section 127 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 as per the decision given by Hon'ble. High Court in Petition No. 9642/2010. In view of this Site No. I/20, PS and PG proposed on same land in Draft D.P. is deleted and land thereunder included in Residential Zone. |
| M I/3 | Site No. I/34, Garden is partly deleted because of sanctioned layout and land thereunder is included in Residential Zone as shown on plan. Remaining Area is retained for Garden as shown on Plan. |

**SCHEDULE**--*Contd.*

| 1 | 2 |
|---|---|
| M I/4 | Site No. I/48, Park is modified as mention below :–<br>a) Occupied land from Site No. I/48, Park and land from Gat No. 454 is partly deleted and included in Residential Zone as shown on Plan.<br>b) Site No. I/53-D is shifted and relocated to the south side of the existing Khadan in Site No. I/48 (P) at the junction of two roads as shown on plan. Land under original Site No. I/53 is included in Residential Zone.<br>c) Land behind Shahapur High School and RTO Office is reserved for MP and PG as shown on Plan.<br>Remaining land is reinstated as per published Draft D.P. under Section 26 of Maharashtra Regional and Town Planning Act as shown on plan. |
| M I/5 | Approved layout of the Ichalkaranji Industrial Co-Operative Estate Ltd. bearing Shahapur Gat Nos. 470-A, 751, 753 to 773, 781 to 785, 789 to 804 shall prevail in respect of Industrial Plots, Internal Roads, Open Space, Amenity / Public Utility Space Etc. The Physical Features, Existing Roads, Zoning, Existing Land Use, Lables etc. shall deem to be modified as per the above sanction layout. In view of this Site No. I/54 (G) proposed on industrial layout plot is deleted and land therunder included in Industrial Zone. Remaining land retain for Garden reservation. |
| M I/6 | Site No. I/67, Garden is deleted due to occupied by building construction and land thereunder included in Residential Zone. |
| M I/7 | Site No. 1/ 70, Garden is deleted and land thereunder included in Residential Zone. |
| M I/8 | Site No. 1/71, Housing for Dishoused is deleted and land thereunder included in Residential Zone because of fully occupied by constructions. |
| M I/9 | Existing Garden shown on Gat No. 843, Shahapur is deleted and shown as Industrial use. |
| M I/10 | Existing PSP use shown on Gat No. 239-C, Shahapur is deleted and shown as Residential use. |
| M I/11 | Existing Industrial use shown on Gat Nos. 177, 178, 173, 172, 170, 169, Shahapur is deleted and shown as Residential use. |
| M I/12 | Existing PSP use shown on Gat Nos. 245, 246 Shahapur is deleted and shown as Residential use. |
| M I/13 | Site No. I/68, TCFC is deleted and land thereunder included in Residential Zone subject to 4000 sq.mtrs. land is proposed for Amenity space / Municipal Purpose as shown on plan and handover the same free of cost (without any compensation in any form) to Municipal Corporation. |
| M I/14 | Site No. I/42, MP is deleted and land thereunder is included in Residential Zone |
| M I/15 | Site No. I/49, FB is retained after excluding / deleting area under Gat No. 466, Shahapur is as shown on plan. Deleted area is included in Residential Zone. |
| M I/16 | Site No. I/18, MHADA is deleted and land thereunder is included in Residential Zone. |
| M I/17 | Site No. I/12, Recreational Ground is partly deleted from Gat No. 38, Shahapur as shown on plan and land thereunder included in Residential Zone. Remaining land reinstated for Site No. I/12 as shown on plan. |
| M I/18 | Site No. I/5, PS and PG is deleted and included in Residential Zone due to approved layout. |
| M I/19 | Site No. I/2, PG is deleted and included in Residential Zone due to approved layout as shown on plan. |

**SCHEDULE**--*Contd.*

| 1 | 2 |
|---|---|
| M I/20 | Site No. I/60, D and I/59, MP are relocated and shifted to the East of Site No. I/58-G along road as shown on plan. Land under original site is included in residential Zone. |
| M I/21 | Site No. I/33 (PG) is redesignated as (PS and PG). The Appropriate Authority shall be Shri Sadguru Pant Maharaj Shikshan Prasarak Mandal, Ichalkaranji. |
| M I/22 | Site No. I/29, G is partly deleted from west side as shown on plan and land thereunder included in residential zone. Remaining land Retained in Garden as shown on plan. |
| M I/23 | 12 mtrs. wide D.P. road adjoining to Police Station (1/9) is deleted and land threunder included in Site Police Station (1/9). |
| | **SECTOR II** |
| M II/1 | Site No. II/5, GB is completely occupied hence deleted and included in Residential Zone. This GB is proposed within Site No. II/8 from the south Boundary. |
| M II/2 | Site No. II/10, PG is Retained after excluding area acquired by CETP as shown on plan. Also south side alignment of 15 mtrs. East-West road is kept as per sanction D.P. The land released from such revised alignment is included in Residential Zone and partly in Site No. II/11(Park) as shown on plan. |
| M II/3 | Site No. II/18, SH is Retain and Redesignated as Municipal Purpose as shown on plan. |
| M II/4 | Site No. II/7 (Garden) is deleted due to approved layout. Also Alignment of adjoining 24 mtrs. road is realign as per sanction D.P. The land released from original alignment of 24 mtrs. road and deletion of Site No. II/7 (G) is included in Residential Zone. |
| M II/5 | Site No. II/25, G is partly deleted due to occupied by existing structure and new 15 mtrs. North-South road is proposed on west boundary (inside the site) construction as shown on plan and Remaining land Retained in Garden as shown on plan. |
| M II/6 | Site No. II/24, PG is partly deleted (50 per cent) from east side and included in Residential Zone. Remaining land Retained in PG as shown on plan. |
| M II/7 | Site No. II/4 (TE) is deleted and land thereunder included in Residential Zone. |
| M II/8 | Site No. II/39, PG is rearranged as mention below –<br>Land from CTS No. 9718 is retained for SC. Land from CTS No. 9710 and R.S. No. 690 is retained for PG excluding part deletion of NW corner land as shown on plan. Deleted area included in Residential Zone. |
| M II/9 | Site No. II/41, (PG) is deleted and shown as Existing PG as shown on Plan. |
| M II/10 | Site No. II/44, (D, LIB, SC) and Site No. II/43 (G) proposed on S. No. 660 (Ichalkaranji) in sanctioned Development Plan is lapsed under the provision of Section 127 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. In view of this Site No. II/43 (G) and Site No. II/44 (VM and SC) proposed on the same land is partly deleted as shown on plan and included in Residential Zone. Remaining land from Site No. II/44 is retained for VM and SC as shown on plan. |
| M II /11 | Site No. II/46, (PG) from North side is deleted (50 per cent area) and land thereunder included in Residential Zone as shown on plan. Remaining land of Site No. II/46 (PG) along with Site No. II/47 (HS and PG) is reinstated for HS and PG as shown on plan. |
| M II/12 | Site No. II/48, HS is deleted and land thereunder included in Residential Zone. |
| M II/13 | Site No. 36, (PS and PG) from sanctioned Development Plan is lapsed under the provision of Section 127 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. In view of this Site No. II/54, PS and PG proposed on the same land is deleted and land thereunder included in Residential Zone. |
| M II/14 | Site No. II/38 (SC) is retained and redesignated as Garden as shown on plan. |

**SCHEDULE**--*Contd.*

| 1 | 2 |
|---|---|
| | **SECTOR III** |
| M III/1 | Site No. 28 (SC) from sanctioned DP is lapsed under the provision of Section 127 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. In view of this Site No. III/18, DISP proposed on same land in Draft D.P. is deleted and land thereunder included in Residential Zone. |
| M III/2 | Part of land from East side of Site No. 25, (PG) from sanctioned Development Plan is lapsed under the provision of Section 127 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. In view of this Site No. III/19, (G) proposed on the same land is partly deleted and land thereunder included in Residential Zone and remaining land retained for GARDEN as shown on plan. |
| M III/3 | Site No. III/31, VM is deleted because of sanctioned and final layout as shown on plan and land thereunder. |
| M III/4 | Site No. 21 (PG) from sanctioned D.P. is lapsed under the provision of Section 127 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. In view of this Site No. III/24, VM is proposed on same land in Draft D.P. is deleted and land thereunder included in Residential Zone. |
| M III/5 | Site No. III/22, PG and Site No. III/23 (D and LIB)is deleted and land thereunder included in Residential Zone. |
| | **SECTOR IV** |
| M IV/1 | Site No. IV/1(PG) is partly deleted and land thereunder included in Residential Zone due to sanctioned layout in Gat No. 25-B (Kabnoor). Remaining land is retained for PG with new NS 9 mtrs. road to the west boundary of reservation as shown on plan. |
| M IV/2 | Site No. IV/6 (DISP) is deleted and land thereunder is included in Residential Zone and Site No. IV/4 (G) is redesignated as (DISP). |
| M IV/3 | Site No. IV/12, PG is occupied by residential construction hence site is deleted and land thereunder is included in Residential Zone. |
| M IV/4 | Layout of Gat Nos. 115, 116 is approved. Hence Site No. IV/18 (Garden) completely Deleted land is included in Residential Zone. |
| M IV/5 | Site No. IV/24 (DISP) is deleted and land thereunder included in Residential Zone. |
| M IV/6 | Site No. IV/33, G is deleted Land thereunder is included in Residential Zone as shown on plan in view of sanction modification under Section 37 *(2)* of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 for deletion of sanction D.P. Site No. III/32 (G). |
| M IV/7 | Site No. IV/14, PG is deleted in view of approved Gunthewari and land thereunder is included in Residential Zone. |
| M IV/8 | Site No. IV/20, CPG is deleted in view of approved layout and land thereunder is included in Residential Zone. |
| M IV/9 | Site No. IV/29, MP is deleted and land thereunder is included in Residential Zone as shown on plan. |
| M IV/10 | 12 mtrs. wide EW DP road passing through Gat Nos. 528, 529, 530, Ichalkaranji is realigned due to approved Gunthewari as shown on plan. Land released from North and South side due to such modification is included in Adjoining Zone. Also boundry of Site No. III/33 (PG) are modified accordingly. |
| M IV/11 | Site No. IV/34, FB and Site No. IV/25, P is deleted Land thereunder is included in Residential Zone as shown on plan. |

**SCHEDULE**--*Contd.*

| 1 | 2 |
| --- | --- |
| | **SECTOR V** |
| M V/1 | Site Nos. V/12, V/13, V/14, V/15, V/16, V/17 which are fully occupied by existing construction hence deleted and land thereunder is included in Residential Zone. |
| M V/2 | Site No. V/28 (G and P) is retained and renamed as per Sanction TPS as GARDEN. |
| M V/3 | Site No. V/30, MP and P is deleted and land thereunder is included in Residential Zone as per court decision. |
| M V/4 | TPS No. 2, FP No. 17, The existing PG which is wrongly shown is deleted and land thereunder included in Residential Zone as shown on plan. |
| | **ZONE CHANGE** |
| MZ 1 | Gat Nos. 65, 66, 67, Mauje Ichalkaranji is included in Residential Zone as shown on Plan. |
| MZ 2 | Gat Nos. 422, 421, 399, 400, 401, 402, Mauje Shahapur is shown as Existing Pond. This existing pond designation is deleted and designated as existing closed Quary. |

**PALLAVI PATIL,**
Commissioner and Administrator,
Ichalkaranji Municipal Corporation, Ichalkaranji.

Ichalkaranji, 5th December 2025.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.